# <u>वार्तापत्र</u>

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. २२/०४/२०१७

## अतिसंवेदनशिल मौजा 'आलदंडी' येथे नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना

उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या मौजा आलदंडी येथे आज दिनांक २२/०४/२०१७ रोजी नवीन पोलीस मदत केंद्राची स्थापना करण्यात आली. अहेरी उपमुख्यालयापासून ३८ किमी व एटापल्ली पासून १० किमी अंतरावर असणाऱ्या अतिदुर्गम व नक्षलग्रस्त अशा आलदंडी येथे जनतेचे संरक्षणासाठी तसेच नक्षली कारवायांना आळा घालण्याकरीता
ाोमके आलदंडीची स्थापना केली आहे.

नक्षलमुक्त गडचिरोलीचे ध्येय साध्य करण्याच्या दृष्टीने अतिसंवेदशील दुर्गमभागातील असलेला नक्षलवादयाचा प्रभाव कमी करण्यासाठी अतिदुर्गम भागात नवीन पोमकेंची स्थापना करण्यात येत आहे. आलदंडी गाव व परिसरातील गावे ही अतिसंवेदशील तसेच आदिवासी बहुल असून नक्षलप्रभावीत आहेत. त्यामुळे या परिसरातील नक्षलवादास आळा घालण्यासाठी पोमके आलदंडीची स्थापना करण्यात आली. आलदंडी गाव व परिसरातील गावकऱ्यांच्या सोबतीने मा. पोलीस अधिक्षक साो. डॉ. अभिनव देशमुख यांच्या हस्ते पोमके आलदंडीची स्थापना व भुमीपुजन करण्यात आले. पोलीस मदत केंद्र स्थापन कार्यक्रमाचे औचीत्य साधून आलदंडी गाव व परिसरातील गावकऱ्यांकरीता जनजागरण मेळावा आयोजीत करण्यात आला होता.

जनजागरण मेळाव्यादरम्यान उपस्थित गावकऱ्यांना पथनाटयाद्वारे विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. तसेच उपस्थित महिलांना साडी व पुरुषांना ड्रेस व शेती उपयोगी साहीत्य तसेच तरूणांना खेळाच्या साहित्याचे वाटप करण्यात आले.

पोमके आलदंडी स्थापनेवेळी मा. पोलीस अधिक्षक साो. डॉ. अभिनव देशमुख, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. मंजुनाथ सिंगे, पोलीस उपअधिक्षक (गृह) श्री. गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकरी एटापल्ली श्री. नितीन जाधव, सिआरपीएफचे १९१ बटालियनचे कमांन्डट श्री. त्रिपाटी, पोमके आलदंडीचे प्रभारी अधिकारी योगेश दाभाडे हे उपस्थित होते. तसेच इतर अधिकारी व कर्मचारी, गावातील प्रतिष्ठीत नागरीक आदी मान्यवर व परिसरातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.


मदत
आलदंडी